नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ९२ Issue - 92 | वार मंगळवार दि. १९ ऑगस्ट २०२५ Blow- Tuesday Date 19 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात सर्वदूर पाऊस



## विदर्भात मुसळधार पावसाचा कहर! धरणांचे दरवाजे उघडले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : विदर्भात रविवारी सकाळपासून मुसळधार पावसाने हाहाकार माजवला आहे. बुलढाणा, अकोला, जळगाव, वाशिम, चंद्रपूरसह अनेक जिल्ह्यांत अतिवृष्टी झाल्याने नद्या-नाले धोक्याच्या पातळीवर पोहोचले आहेत. धरणांचे दरवाजे उघडावे लागले असून, शेकडो गावांचा संपर्क तुटला आहे. हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली असून, अनेक घरांना व दुकांनांना पाण्याचा फटका बसला आहे.

**पूराच्या पाण्यात जनजीवन ठप्प**

बुलढाण्यातील मेहकर, चिखली, सिंदखेड राजा तालुक्यांत मुसळधार पाऊस झाला. नदी-नाले तुडुंब भरून वाहू लागले. चिखली तालुक्यातील शेलगाव आटोळ येथे एक युवक पुराच्या पाण्यात वाहून गेला; त्याचा मृतदेह चार तासानंतर सापडला. जिल्ह्यात शेकडो हेक्टर शेती जलमय झाली आहे. बुलढाणा-चिखली, नागपूर-मुंबई, खामगाव-मेहकर यांसह अनेक महामार्ग बंद झाले आहेत. ग्रामीण भागात घरांमध्ये पाणी शिरून पडझड झाली असून जनजीवन विस्कळीत झाले आहे.



अकोल्यात मुसळधार पावसामुळे काटेपूर्णा प्रकल्पाचे सर्व १० दरवाजे ६० सें.मी.ने उघडण्यात आले असून ४८० क्युसेक पाणी नदीपात्रात सोडण्यात येत आहे. तर पारस औष्णिक विद्युत केंद्रासाठी बनवलेल्या बाळापूर प्रकल्पाचे १० दरवाजे उघडण्यात आले आहेत. परिणामी बाळापूर शहराचा जिल्हा मुख्यालयाशी संपर्क तुटला आहे. मन आणि महेशा नदीकाठच्या भागांत पाणी शिरल्याने नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करण्यात आले आहे.

जळगाव जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे धबधबे पर्यटनाचे केंद्र ठरत आहेत. अजिंठा लेणी परिसरातील सप्तकुंड धबधबा आणि यावल तालुक्यातील मनू देवी धबधबा मोठ्या धबधक्यासह वाहू लागले आहेत. मात्र, रावेर-अजनदा जोडणाऱ्या पुलावरून पाणी वाहू लागल्याने वाहतूक रोखण्यात आली आहे. सकाळपासून पाऊस थांबल्याने पूर ओसरला असला तरी ,नाल्याच्या पुराने अनेक शेतात आणि घरात पाणी शिरल्याने पिकांचे आणि घरांचे नुकसान झाल्याचे पाहायला मिळाले,काही ठिकाणी घराच्या भिंती कोसळल्या आहेत तर बक्षी पुरा गावात वादळी पावसात सहा बकऱ्या मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे

चंद्रपूर जिल्ह्यात दोन दिवसांपासून पाऊस झाला नसला तरी पश्चिम विदर्भातील मुसळधार पावसामुळे वर्धा नदीला मोठा पूर आला आहे. ईसापुर आणि सातनाला धरणांतून मोठा विसर्ग सुरू झाल्याने वर्धा, पैनगंगा, इरई आणि झटपट नद्यांच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे चंद्रपूर-हडस्ती आणि चोरगाव रस्ते बंद करण्यात आले आहेत. मात्र, इरई धरणातून पाणी सोडलेले नसल्याने शहराला पुराचा धोका आत्तापर्यंत टळला आहे.

वाशिमच्या नेतन्सा परिसरात थरारक घटना घडली. नमहादेव मंदिर दर्शनाला गेलेल्या ८ युवकांना कांचनदीच्या पुराने वेढा घातला. हे युवक जवळपास पाच तास पाण्यात अडकले होते. अखेर धाडसाने एका युवकाने बाहेर पडून थरारक सुटका केली. प्रशासनाकडून मदत पोहोचण्यास विलंब झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. अमरावती-यवतमाळ जिल्ह्यात गेले दोन दिवस पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे इसापूर धरणाचा विसर्ग सुरू आहे. या धरणाचे पाणी पैनगंगा नदीतून वर्धा नदीत आल्याने वर्धा, इरई आणि झरपट नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे.

राज्यातील अनेक भागात अजूनही मुसळधार पाऊस सुरू असून नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. धोक्याची पातळी ओलांडलेल्या नद्यांच्या काठावर नागरिकांनी जाणे टाळावे तसेच नदीपात्र ओलांडू नये, अशा सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

## रशियाच्या ब्लादीमर पुतीन यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदींना फोन; डोनाल्ड ट्रम्पसोबतच्या भेटीचा दिला वृत्तांत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : रशिया आणि युक्रेन युद्धाकडे अवघ्या जगाचे लक्ष लागले असून हेही युद्ध थांबावे अशी भारतसह जगभरातील अनेक देशांची इच्छा आहे. त्याच अनुषंगाने रशियाचे राष्ट्रपती व्लादीमीर पुतीन आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात भेट होऊन चर्चा झाली होती. त्यानंतर, व्लादीमीर पुतीन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना फोन करुन यासंदर्भात माहिती दिली. अलास्का येथे पुतीन आणि ट्रम्प यांच्यात भेट होऊन युद्धजन्य परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चा झाली होती. या चर्चेनंतर पुतीन यांच्यासमवेत फोनवरुन बोलणं झाल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ट्विट करुन सांगितलं आहे.



रशिया आणि युक्रेन यांच्या सुरू असलेल्या युद्ध परिस्थितीवर शांतीपूर्ण समाधान काढण्यात यावे, त्यासाठी भारत खंबीरपणे रशियाच्या पाठीशी असल्याचं मोदींनी म्हटलं. तसेच, याबाबत सुरू असलेल्या सर्वच प्रयत्नांना भारताचे समर्थन असल्याचेही मोदींनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि व्लादीमीर पुतीन यांच्यात झालेल्या फोनवरील संभाषणात दोन्ही देशांमधील द्विपक्षीय सह्योगावर देखील चर्चा झाली असून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पुतीन यांच्या फोनबद्दल आभार मानले आहेत. विशेष म्हणजे, भारताने रशियाकडून तेल खरेदी करण्यावर अमेरिकेने ५० टक्के टॅरिफ लागू केल्यानंतर ही बैठक झाली होती. आता, या बैठकीनंतर रशियाचे राष्ट्रपती व्लादीमीर पुतीन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची फोनवरुन चर्चा झाली आहे. त्यामुळे, या फोनवरील चर्चेला जागतिक स्तरावरही विशेष महत्त्व आहे.

दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर टॅरिफ लादल्यानंतर दोन्ही देशांमधील संबंध थोडेसे तणावग्रस्त आहेत. त्यातच, अमेरिका आणि भारत यांच्यात २५-२९ ऑगस्टपर्यंत व्यापार करारावर चर्चा होणार होती. मात्र, एका रिपोर्टमध्ये असा दावा करण्यात आला आहे की, अमेरिकेचं शिष्टमंडळ व्यापार करारासंदर्भातील पुढील बैठकीसाठी येणार नाही. अमेरिकेच्या शिष्टमंडळाकडून नवी तारीख निश्चित केली जाईल, असं सांगितलं जातंय. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराबाबत पाच वेळा चर्चा झालेली आहे. सहाव्या फेरीच्या चर्चेसाठी अमेरिकेचे शिष्टमंडळ भारतात येणं अपेक्षित होतं. मात्र, सध्या ते लांबणीवर पडलं आहे.

## रिक्षाचालकाचा कहर! अनेक वाहनांना दिली धडक; महिला कॉन्स्टेबलने थांबवताच फरफटत नेलं

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा : साताऱ्यातील खंडोबाचा माळ ते मार्केट यार्ड दरम्यान मद्यधुंद रिक्षाचालकाने बेदरकारपणे रिक्षा चालवत सहा दुचाकी आणि चारचाकी वाहनांना धडक दिली. त्याला थांबविण्याचा प्रयत्न करणाऱ्या वाहतूक शाखेतील महिला कॉन्स्टेबलला खेचून शंभर मीटरपर्यंत फरफटत नेलं. त्यामुळे त्या रक्तबंबाळ झाल्या. त्यांना गंभीर जखमी अवस्थेत खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. संतप्त नागरिकांनी रिक्षाचालकाचा पाठलाग करून रिक्षा अडवली आणि चालकाला बेदम चोप दिला.



मद्यधुंद अवस्थेत रिक्षा चालक खंडोबाचा माळ येथून मार्केट यार्ड रस्त्याने बेदरकार रिक्षा चालवत येत होता. यादरम्यान त्याने अनेक दुचाकी तसेच चारचाकी वाहनांना धडक दिली. शहर वाहतूक शाखेतील महिला कॉन्स्टेबलने त्याला अडविण्याचा प्रयत्न करताच चालकाने त्यांच्या हाताला पकडून रिक्षा वेगाने चालवली. त्यांना रस्त्यावरून शंभर मीटर अंतर फरफटत नेले. यावेळी मार्केट यार्ड रस्त्यावर भरधाव रिक्षाचा थरार आणि नागरिकांची धावाधाव पाहायला मिळाली.

रिक्षा चालकाने फरफटत नेल्यामुळे महिला कॉन्स्टेबल रक्तबंबाळ होऊन त्या गंभीर जखमी झाल्या आहेत. रिक्षाचालक महिला कॉन्स्टेबलला फरफटत नेत असल्याचे पाहून त्यांना वाचविण्यासाठी अनेक नागरिक रिक्षाच्या मागे धावत होते. अखेर नागरिकांनी रिक्षा अडवली. मद्यपी चालकाला बेदम चोप दिला. जखमी महिला कॉन्स्टेबलला तातडीने खाजगी रुग्णालयात दाखल केलं. पोलीस आल्यानंतर रिक्षा चालकाला त्यांनी ताब्यात घेतलं. रात्री त्याला अटक करण्यात आली.

साताऱ्यात वाहतुकीची शिस्त बिघडलेली असतानाच आता त्यात रिक्षा चालकांच्या मुजोरीची भर पडली आहे. रिक्षाचालक कधीही वाहतुकीचे नियम पाळत नाहीतच शिवाय प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा दराने पैसे घेतात. प्रवाशांना उर्मटपणे बोलतात. दारूच्या नशेत वाहन चालविणे, महिलांना टोमणे मारणे, अशा घटना घडत असल्याच्या तक्रारीही आता नागरीक करत आहेत.

**महाराष्ट्रामध्ये मुसळधार पावसाचा अंदाज**

**२१ ऑगस्टपर्यंत ही परिस्थिती कायम राहण्याचा अंदाज**

## 'रेड अॅलर्ट'! मुंबई, ठाणे, पालघर, रायगडमध्येही मुसळधार पावसाची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई, ठाणे आणि रायगडसाठी मंगळवारी रेड अॅलर्ट कायम असून पालघरमध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असल्याने पालघर जिल्ह्यासाठी मंगळवारी रेड अॅलर्ट जारी करण्यात आला आहे.



मुंबई : मुंबईमध्ये सोमवारी मान्सूनचा तडाखा बसून रस्त्यांवर विविध ठिकाणी गुडघाभराहून अधिक पाण्यातून वाटचाल करत मुंबईकरांना प्रवास करावा लागला. १८ ऑगस्ट रोजी बंगालच्या उपसागरात आणखी एक प्रणाली निर्माण होऊन महाराष्ट्रामध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली होती. यासाठी कोकण विभागाला ऑरेंज अॅलर्ट देण्यात आला होता. मुंबईमध्ये रविवारी रात्रीनंतर मुसळधार पावसाला सुरुवात होऊन प्रणाली अधिक तीव्र झाल्याने हा अॅलर्ट मुंबई आणि ठाणे परिसरासाठी रेड अॅलर्टमध्ये अद्ययावत करण्यात आला. मुंबई, ठाणे, पालघर तसेच रायगड जिल्ह्यांना मंगळवारीही रेड अॅलर्ट देण्यात आला आहे.

पश्चिम मध्य आणि लगतच्या वायव्य बंगालच्या उपसागरामध्ये तीव्र कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झालेले आहे. या क्षेत्राशी निगडीत चक्रीय वातस्थिती या तीव्र कमी दाबाच्या प्रणालीच्या नैर्ऋत्य दिशेला निर्माण झाली आहे. ही स्थिती मंगळवार, १९ ऑगस्टला तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामध्ये रूपांतरित होईल आणि उत्तर ओडिशा, आंध्र प्रदेश किनारपट्टीवरून आत येऊन वायव्य दिशेने प्रवास करेल. मान्सूनची द्रोणीय रेषा आता जळगाव, ब्रह्मपुरी या क्षेत्रावर असलेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामधून जात आहे. अरबी समुद्राच्या आग्नेय दिशेला आणि लगतच्या गुजरातजवळ हवेच्या वरच्या थरात चक्रीय वातस्थिती निर्माण झाली आहे. तसेच पूर्व-पश्चिम वाऱ्यांचा प्रवाह असल्याने महाराष्ट्रामध्ये मान्सून तीव्र असून २१ ऑगस्टपर्यंत ही परिस्थिती कायम राहण्याचा अंदाज आहे.

सोमवारी मुंबईतील उपनगरांमध्ये पावसाचे प्रमाण अधिक होते. रविवारी सकाळी ८.३० ते सोमवारी सकाळी ८.३० या कालावधीत सांताक्रूझ येथे ९९४. मिलीमीटर पावसाची नोंद झाली तर कुलाबा येथे ३८.४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. तर सकाळी ८.३० ते सायं. ५.३० या वेळेत कुलाबा येथे ४५.२ तर सांताक्रूझ येथे १२३.९ मिलीमीटर पाऊस नोंदला गेला. प्रादेशिक हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार विक्रोळी येथे सकाळपासून सर्वाधिक म्हणजे १३५.५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. त्याखालोखाल चेंबूर येथे १२४ मिलीमीटर पाऊस नोंदला गेला. मुंबईमध्ये पावसाचा जोर दुपारच्या वेळेस काहीसा कमी झाला होता. त्यामुळे पावसामुळे साचलेले पाणी काही प्रमाणात ओसरण्यामध्ये मदत झाली. सकाळी ८.३० ते दुपारी २.३० या कालावधीत चेंबूर येथे ११७, तर विक्रोळी येथे १०३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली होती.

कुलाबा आणि सांताक्रूझ या दोन्ही केंद्रांवर १५ ऑगस्टपासून पावसाचे प्रमाण वाढल्याचे दिसत असून, १८ ऑगस्टपर्यंत कुलाबा येथे ३२२.४ तर सांताक्रूझ केंद्रावर ५५३.६ मिलीमीटरचा टप्पा ऑगस्टच्या पावसाने गाठला आहे. सांताक्रूझ येथे पावसाळ्यातील आत्तापर्यंत पावसाने सरासरी ओलांडली असून कुलाबा येथेही पावसाळ्यातील एकूण पाऊस १,२९५ मिलीमीटरपर्यंत पोहोचला आहे. कुलाबा येथे सध्या २८४ मिलीमीटर पावसाची तूट आहे मात्र ही तूटही लवकरच भरून निघेल असे सध्याच्या परिस्थितीवरून दिसत आहे. कोकणामध्ये अलिबाग, डहाणू, हर्णे, रत्नागिरी या केंद्रांवर जून, जुलै तसेच ऑगस्टच्या पहिल्या दोन आठवड्यांपर्यंत पावसाचा जोर फारसा नसल्याने तूट कायम आहे. मुंबई उपनगरे वगळता कोकणातील इतर केंद्रांवर सोमवारी दिवसभरात फारसा पाऊस नोंदला गेला नाही.

अलिबाग येथे ४० तर रत्नागिरी केंद्रावर ३५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. मात्र या केंद्रापलीकडे दुर्गम भागांमध्ये पावसाचा जोर अधिक होता. नद्यांनीही धोक्यांची पातळी ओलांडल्याचे समोर आले.

रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अॅलर्ट देण्यात आला आहे. नाशिक घाट, पुणे घाट तसेच सातारा घाट परिसरातही मंगळवारसाठी रेड अॅलर्ट देण्यात आला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यांना बुधवारी ऑरेंज, तर रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात यलो अॅलर्ट असेल. त्यानंतर गुरुवारी २१ ऑगस्टला पावसाचा जोर कमी होण्याची शक्यता आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड तसेच रत्नागिरी या जिल्ह्यांना यलो अॅलर्ट म्हणजे तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता असून सिंधुदुर्गाला कोणताही इशारा नाही. घाट भागातील पावसाचा जोरही बुधवारनंतर कमी होईल अशी शक्यता आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### सर्वत्र 'रेन' अलर्ट

पश्चिम मध्य आणि लगतच्या वायव्य बंगालच्या उपसागराम ध्ये तीव्र कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झालेले आहे. या क्षेत्राशी निगडीत चक्रीय वातस्थिती या तीव्र कमी दाबाच्या प्रणालीच्या नैर्ऋत्य दिशेला निर्माण झाली आहे. ही स्थिती मंगळवार, १९ ऑगस्टला तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामध्ये रूपांतरित होईल आणि उत्तर ओडिशा, आंध्र प्रदेश किनारपट्टीवरून आत येऊन वायव्य दिशेने प्रवास करेल. मान्सूनची द्रोणीय रेषा आता जळगाव, ब्रह्मपुरी या क्षेत्रावर असलेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामधून जात आहे. अरबी समुद्राच्या आग्नेय दिशेला आणि लगतच्या गुजरातजवळ हवेच्या वरच्या थरात चक्रीय वातस्थिती निर्माण झाली आहे. तसेच पूर्व-पश्चिम वाऱ्यांचा प्रवाह असल्याने म हाराष्ट्रामध्ये मान्सून तीव्र असून २१ ऑगस्टपर्यंत ही परिस्थिती कायम राहण्याचा अंदाज आहे. मुंबईमध्ये पावसाचा जोर दुपारच्या वेळेस काहीसा कमी झाला होता. त्यामुळे पावसामुळे साचलेले पाणी काही प्रमाणात ओसरण्यामध्ये मदत झाली. कोकणामध्ये अलिबाग, डहाणू, हर्णे, रत्नागिरी या केंद्रांवर जून, जुलै तसेच ऑगस्टच्या पहिल्या दोन आठवड्यांपर्यंत पावसाचा जोर फारसा नसल्याने तूट कायम आहे. अलिबाग येथे ४० तर रत्नागिरी केंद्रावर ३५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अॅलर्ट देण्यात आला आहे. नाशिक घाट, पुणे घाट तसेच सातारा घाट परिसरातही मंगळवारसाठी रेड अॅलर्ट देण्यात आला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यांना बुधवारपर्यंत ऑरेंज, तर रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात यलो अॅलर्ट असेल.



# मासुर्डी गावचा सर्वांगीण विकास हेच ध्येय : सरपंच पुष्पा पाटील

## औसा तालुक्याचे लोकप्रीय आ.अभिमन्यु पवार साहेबांच्या विशेष प्रयत्नातुन मासुर्डी गावचा सर्वांगीण विकास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील मासुर्डी गावाने गेल्या काही वर्षांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. या गावाच्या विकासामागे सर्वप्रथम आदर्शवत नेतृत्वाची गरज होती, आणि ती गरज पूर्ण केली आहे सरपंच पुष्पा पाटील यांनी सरपंचपदी तसेच गावप्रमुख म्हणुन त्यांनी मासुर्डी गावाचा सर्वांगीण विकास आणि महिला सक्षमीकरणाला प्राधान्य देत गावाचा विकासाचा नवा आलेख रचला आहे.



गाव विकासासाठी एकात्मिक दृष्टीकोन सरपंच पुष्पा पाटील यांच्या पुढाकारातून मासुर्डी गावात शिक्षण, आरोग्य, जलजिवन मिशन, जलसंपदा व्यवस्थापन आणि महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी विविध योजना राबवण्यात आल्या. त्यांनी गावातील प्रत्येक घरपरिवाराशी संवाद साधून त्यांच्या गरजा ओळखून योजनांची अंमलबजावणी केली, ज्यामुळे गावातील लोकांचा विकासाच्या प्रक्रियेत सहभाग वाढला.मासुर्डी गावचा कारभार ज्या ग्रामपंचायत मधुन केला जातो त्या ग्रामपंचायतची भव्य दिव्य ईमारत बांधकाम चालु असुन

सरपंच पुष्पा भाउसाहेब पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगीतले की, माझं उद्दिष्ट मासुर्डीचा विकास व प्रत्येक नागरिकाला दर्जेदार जीवनमान सुखसोई मिळाव्या . विशेषतः महिलांना सशक्त बनवणं अत्यंत आवश्यक आहे कारण ते आमच्या गावाच्या विकासाचा पाया आहे.

पुष्कळ गावांप्रमाणेच मसुर्डीला देखील महिलांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीचा वाढता आलेख पाहता. सरपंच पुष्पा पाटील यांच्या सततच्या प्रयत्नांनी महिलांना स्वयंरोजगार योजना आणि स्वरोजगार प्रकल्पांत सहभागी करून त्यांच्या आत्मनिर्भरतेला चालना दिली. .

मासुर्डी गावातील महिलांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी त्यांच्या धोरणांनी खूप मदत झाली आहे.

**राजकीय नेतृत्व व गाव विकास यांच्या संगमातून निर्माण होणारा भविष्यकाळ**

औसा तालुक्याच्या इतर गावांसाठीही मासुर्डी गावाला विकास मॉडेल प्रेरणादायी आहे. येथे शाश्वत विकासासाठी पर्यावरण बचत, जलजिवन मिशन ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारणा या क्षेत्रांनी जास्त लक्ष दिले जात आहे. याशिवाय, अहवालप्रणाली सुधारून ग्रामस्थांच्या सुविधा वाढवण्यात मदत केली जात आहे.

औसा तालुक्यातील मासुर्डी गावात विकासाचा वारसा आणि आर्थिक स्वावलंबन हेच सरपंच पुष्पा भाउसाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखालील गाव विकासाचा गाभा ठरला आहे. महिलांना समान सामाजिक स्थान देऊन त्यांचा सक्षमीकरणा करण्याबरोबरच गावचा विकास करत असताना गावातील गल्लोगल्ली नवनवीन रस्ते हर घर जल च्या माध्यमातून घरोघरी नळाच्या माध्यमातून पाणी गाव हागणदारी मुक्त सह अनेक मूलभूत सुविधा देणारी ग्रामपंचायत म्हणूनही मासुर्डी ग्रामपंचायतला पहिले जाता.. वेळेवरच न थांबता येणाऱ्या काळात जे जे न व ते.ते मासुर्डी गावला हवं या संकल्पनेतून मी गावचा सर्वांगीण विकास करणार असल्याचे सरपंच पुष्पा भाउसाहेब पाटील यांनी सांगितले.

# निफाड येथे जागतिक आदिवासी उत्साहात साजरा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी

जागतिक आदिवासी दिन निफाड शहरात मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला,या वेळी मुख्य आकर्षन आदिवासी नृत्याने उपस्थित भाराऊन गेले या वेळी भव्य मिरवणूक काढण्यात आली असून पारंपारिक पद्धतीने पावरी व आदिवासी वाद्यचे पूजन करण्यात आले प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रांतिकारी बीरसा मुंडा,भगवान एकलव्य, तंटया मामा भील,माता शबरी, छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून मिरवणूक काढण्यात आली या प्रसंगी आयोजक सरला माळी, रमेश पवार,शरद पवार,खंडू माळी,नगर सेवक साहेबराव बर्डे, सामाजिक कार्यकर्ते भिमराज साळुंके,प्रकाश माळी प्रमुख पाहुणे नगराध्यक्षा शारदाताई नंदकुमार कापसे,उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे , पोलिस अधिक्षक गणेश गुरव ,संजय गाजरे ,माजी नगरसेविका लक्ष्मी फकिरा पवार, दीपक बर्डे पावरी वादक भवराव पवार, बालम गाडवे,रमेश पिठे,हिरामण पिठे,विलास मोरे शोभा पवार,दीपक माळी,अनिल माळी,दीपक सूर्यवंशी,सतीश पवार,सुनील पवार , पत्रकार सागर निकाले, व मोठ्या प्रमाणात आदिवासी बांधव उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी रीत्या पार पाडन्या साठी राजू माळी,राकेश वसुदेव,गणपत सुरोसे, गबाजी रजपूत, वैभव सताळे,नितीन पवार, गबाजी देशमुख यांनी मेहनत घेतली

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भिमराज साळुंके यांनी केले..

## त्रासाला कंटाळून एकाची गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर, (प्रतिनिधी) : त्रासाला कंटाळून एकाची राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना २१ जुलै रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास मुस्लिम पाच्छा पेठ येथे घडली. याप्रकरणी तरन्नुम महिबुब कुरेशी (वय-३८,रा. सिद्धेश्वर नगर भाग-४, नई जिंदगी,मजरेवाडी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून जब्बार हसन शेख (रा.अमन चौक, नई जिंदगी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांचे पती महिबूब कुरेशी (वय-५२) यांना वरील संशयित आरोपी याने फोन करून मुस्लिम पाच्छा पेठ येथे बोलावून तू जर माझ्याकडून व्यापारासाठी घेतलेले दहा लाख रुपये परत दिले नाहीत, तर तुला सोडत नाही.मला उद्या दुपारी बारा वाजेपर्यंत सर्व पैसे व त्यावरील व्याज पाहिजे.नाहीतर तुझ्या घरी येऊन तुला बघतो व जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली होती.म्हणून फिर्यादी यांचे पती महिबूब यांनी वरील संशयित आरोपी याच्या त्रासाला कंटाळून राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोसई.गाढवे हे करीत आहेत.

## स्वातंत्र्यदिनी तहसिल कार्यालय येथे ध्वजारोहण संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : स्वातंत्र्याच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त तहसिल कार्यालय येथे प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहणाचा शासकीय कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी महेश रोकडे, नायब तहसिलदार बालाजी पुदलवाड, डि.एस.आसवले, निवडणुक नायब तहसिलदार वैभव बुचके, मंदिर समितीच्या सदस्या शंकुतला नडगिरे तसेच स्वातंत्र्य सैनिक, मान्यवर नागरिक, पदाधिकारी व अधिकारी-कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी पंढरपूर पोलीस पथकाच्यावतीने मानवंदना देण्यात आली.

यावेळी स्वातंत्र्य औचित्य साधून उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्याहस्ते शहिद मेजर कुणाल गोसावी यांचे पिता मुन्नागिरी गोसावी यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

# शिरवळ येथे सनशाईन प्रि ईंग्लिश स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी

७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या औचित्य साधून आज मौजे शिरवळ ता अक्कलकोट येथे सनशाईन प्रि ईंग्लिश मेडियम स्कूल मध्ये मोठ्या उत्साहात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला कार्यक्रमाचं अध्यक्ष सनशाईन प्रि स्कूलचे चेअरमन सौ शितल नितीन पाटील हे होते या येळी महात्मा गांधीजी यांचा प्रतीमा पूजन मुंबईचे उद्योगपती श्री विलास भोसले व सनशाईन शाळेचे सचिव स्वाती पंडित माने पाटील यांच्या हस्ते




व ध्वाजपुज्या श्री पाप्पा काका कुलकर्णी व नंदकिशोर भोसले यांच्या हस्ते करण्यात आला व ध्वजारोहण माजी सैनिक श्री वसंत कवडे व माजी सैनिक श्री बाबूराव मामा सुरवसे साहेब यांच्या हस्ते करण्यात आला या वेळी अनेक मान्यवर यांचे मनोगत व्यक्त करण्यात आला. व लहान मुलांचे भाषण घेण्यात आला व लहान मुले हे देश भक्ती गीत वरती नृत्य सादर केले या कार्यक्रमाला गावातील व सदलापूर. सांगवी या गावातील अनेक लोक उपस्थित होते हा कार्यक्रम फार पाडण्यासाठी सनशाईन प्रि स्कूलचे शिक्षिका पल्लवी बागेवाडी तसेच शाळेचे सचिव सौ स्वाती ताई पंडित माने पाटील व सौ स्वाती ताई सुमंत हळ्ळूरे आणि शाळेचे उपाध्यक्षा सौ ईरम्मा पाताळे यानी विशेष सहकार्य लाभले.उपस्थित सर्व मान्यवराचा आभार श्री राजकुमार पाताळे यांनी मांडला .

## पडघ्यात ओमसाई गोविंदा पथकाकडून सामाजिक संदेश देत दहीहंडी उत्सव साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा ओमसाई गोविंदा पथकाकडून निष्ठेने आपले कर्तव्य पार पाडणाऱ्या पोलिस बाधवांसाठी हातात पोस्टर घेऊन पोलिसांच्या कार्याला सलाम करत सामाजिक संदेश देत आगळ्या वेगळ्या पद्धतीने दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. पडघा परिसरात अनेक ठिकाणी विविध गोविंदा पथकांनी मानवी मनोरे रचत दहिहंडी फोडली. कायदा आणि सुव्यवस्था राखणे तसेच कायद्याची कठोर अंमलबजावणी करून लोकशाहीचे रक्षण करणे ही पोलिसांची जबाबदारी आहे. ती जबाबदारी कोणताही सण असो किंवा उत्सव, पोलिस बांधवांना त्या काळात बंदोबस्तासाठी तैनात राहावे लागते,कोणताही सण, उत्सव असला तरी पोलिस कुटुंबापासून दूर कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे काम करत असतात . पोलीस यंत्रणा बंदोबस्तासाठी आणि गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणतेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सज्ज असतात म्हणून यांची गांभीर्य लक्षात घेता पडघ्यात गोविंदा पथकांची रॅली निघाली असताना पडघ्यातील ओमसाई गोविंदा पथकाद्वारे




### महाराष्ट्र पोलिसांना केला सलाम

हातात पोस्टर घेऊन पोलिस बांधवांच्या कार्याला सलाम करत पोलिस बांधवां बद्दल असलेला आदर, आत्मीयता तर निष्ठेने आपले कर्तव्य पार पाडणारे पोलिस बांधवांना यावेळी पडघ्यातील ओमसाई गोविंदा पथकातील तरुणांनी ,बालगोपाळांनी दिवा लागला दारोदारी तरीही आम्ही नाही आमच्या घरी, महाराष्ट्र पोलिसांना एक सलाम.' अशा आशयाचे बॅनर्स घेऊन पोलिस बांधवांच्या कार्याला सलाम देत सामाजिक संदेश दिला आहे.यावेळी पडघ्यात अशा नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे सामाजिक संदेश दिल्याने पडघा येथिल ओमसाई गोविंदा पथकामधील तरुणांचे कौतुक केले जात असून अशा सामाजिक संदेश देणाऱ्या उपक्रमाचे सर्वच ठिकाणाहून स्वागत केले जात आहे.

# स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने भूमी अभिलेख कार्यालय सिंदखेडराजाच्या माध्यमातून नागरिकांना मालमत्ता पत्रकाचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मा. पालकमंत्री यांच्या हस्ते नागरिकांना मालमत्ता पत्रक वाटप करण्यात येत आहे. स्वामित्व योजना मालमत्ता पत्रक वितरण हा उपक्रम महसूल व भूमी अभिलेख विभाग ,ग्राम विकास विभाग आणि भारतीय सर्वेक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमानातून पार पडला.



१५ ऑगस्ट च्या निमित्ताने मा. पालकमंत्री बुलढाणा श्री. मकरंद पाटील साहेब यांच्या हस्ते तसेच मा. जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख बुलढाणा श्री नरेंद्र झांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली बुलढाणा जिल्ह्यात मालमत्ता पत्रकाचे वाटप करण्यात आले.

स्वामीत्व योजना ही केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना आहे. महाराष्ट्र मध्ये महास्वामित्व योजनेअंतर्गत नागरिकांना सनद वाटप करण्यात येत आहे. काल भूमी अभिलेख कार्यालय सिंदखेड राजा येथे नागरिकांना सनद वाटप करण्यात आल्या आहेत.

या मालमत्ता पत्रकाच्या माध्यमातून तंत्रज्ञानाची साथ व जमिनीचा अधिकार आपल्या हातात येणार आहे. हे मालमत्ता पत्रक आपल्या घराच्या जागेचे महत्वाचे कागदपत्र असणार आहे.

हे मालमत्ता पत्रक म्हणजे सेवा एक फायदे अनेक असे आहे,

१) अत्याधुनिक ड्रोनच्या सहाय्याने गावठानातील मिळकतीचे अचूक मोजमाप ,नकाशा आणि मालमत्ता पत्रक तयार करणे आता झाले सोपे व जलद

२) सीमा निश्चिती आणि मोजमापाची कामे आता अधिक प्रभावीपणे आणि वेळेत पूर्ण होतील

३) मालमत्तेची कायदेशीर मालकी आणि सुरक्षिततेची हमी

४) कर्ज मिळण्याची सुलभ सुविधा

५) जमिनीशी संबंधित मतभेदांचे त्वरित निराकरण मालमत्तेचे विभाजन अधिक सुलभ

६) गावांच्या आर्थिक प्रगतीला नवी दिशा व चालना

या मालमत्ता पत्रकातून वरील सर्व फायदे नागरिकांना मिळणार आहेत.

भूमी अभिलेख सिंदखेड राजा कार्यालयाचे दोन पथके हे सावखेड तेजन आणि विझोरा या गावामध्ये गेले होते आणि त्यांनी तिथे मार्गदर्शन शिबीर घेऊन तेथील नागरिकांना सनद प्रमाणपत्राचे महत्व सांगून त्याचे वाटप केले आहेत.या दोन्ही पथकाच्या माध्यमातून एकूण ६३,६५०/- ₹ एवढी विक्रमी सनद फीस ची वसुली करण्यात आली.

सावखेड तेजन येथील पथकामध्ये मुख्यालय सहायक मारोती थोरवे, परिरक्षण भुमापक गोपाल वाघमारे, भुमापक प्रकाश शिंदे हे होते तर विझोरा येथील पथकामध्ये निमतनदार राजाराम चोखट, भुमापक आयुष नायगावकर, अनिल बरबडे उपस्थित होते.

सिंदखेड राजा येथील कार्यालयामध्ये मनुष्यबळ कमी असल्यामुळे येथील कार्यालयातून सर्वात कमी म्हणजेच फक्त दोन पथक तयार करण्यात आली होती परंतु येथील पथकातील कर्मचाऱ्यांनी खूप मेहनत घेऊन जिल्हात सर्वाधिक सनद फीस वसुली केली आहे, मा. जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख बुलढाणा नरेंद्र झांबरे साहेब यांनी या कामाचे कौतुक केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अनिल गुंड यांच्या तिन्ही मुलींच्या शिक्षणासाठी शिवसेना नेते अजित पिंगळे यांचा हातभार

## प्रत्येकी ₹५०,००० ची एफडी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते सुपूर्द



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : तालुक्यातील खामसवाडी येथील दुर्दैवी घटनेत विजेच्या तुटलेल्या तारेचा धक्का लागून तरुण शेतकरी अनिल गुंड यांचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी व तीन चिमुकल्या मुली आहेत मोठी मुलगी पाचवीत, मधली तिसरीत तर धाकटी अंगणवाडीत शिक्षण घेत आहे.

या मुलींच्या भविष्यासाठी शिवसेना नेते अजित पिंगळे यांनी संवेदनशीलता दाखवत प्रत्येकी ₹५०,००० रुपयांची फिक्स डिपॉझिट (FD) करण्याचा निर्णय घेतला.

एकूण ₹१५,०००० रुपयांच्या ऋऊ चे प्रमाणपत्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. प्रताप सरनाईक यांच्या हस्ते अनिल गुंड यांच्या कुटुंबाला सुपूर्द करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत गरजूंना आधार देण्याचे महत्त्व अधोरेखित केले. या आर्थिक मदतीमुळे तिन्ही मुलींच्या शिक्षणाचा मार्ग सुकर होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# लाहोटी यांच्याकडून श्रीं विठ्ठल चरणी चांदीचा मुकुट व श्री रुक्मिणी मातेकडे चांदीचा मुकुट अर्पण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आज दिनांक २७/०८/२०२५ रोजी जालना येथील श्री राजेश किसनलाल लाहोटी. यांनी श्रीं विठ्ठल चरणी चांदीचा मुकुट, व श्री रुक्मिणी मातेकडे चांदीचा मुकुट अर्पण केला. दोन्ही चांदी मुकुटाचे वजन १९१५.००० ग्रॅम इतके असून त्याची रक्कम रु २,११,०००/- इतकी झाली असून भाविकांचा सत्कार मंदिर समितीच्या वतीने करण्यात आला.

# ॲड. दिलीप डांगे यांच्याकडून कमलाई मंदिरास देणगी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री कमलाई देवी मंदिराची पुरातन दगडी स्वरूपातील असलेले मूळ मंदिराचे दर्शन भाविक भक्तांना मिळणार आहे. श्री जगदंबा कमलाई देवी मंदिर ट्रस्टच्या संयोजकाने श्री कमलाई देवी मंदिर जतन व संवर्धन कामास गेल्या वर्षापासून सुरुवात करण्यात आलेली आहे. मंदिर जतन संवर्धनाचे काम प्रगतीपथावर असून भक्ताची देणगीरुपी सहकार्यातून या कामास सुरुवात करण्यात आलेले आहे. मंदिर जतन संवर्धन कामास शुक्रवार दिनांक १५/०८/२०२५ रोजी अँड. दिलीप रामसिंग डांगे राहणार रोशेवाडी सध्या मुंबई यांच्याकडून ऑनलाइन देणगी ५००१/(पाच हजार एक रुपये फक्त) प्राप्त झाली आहे. त्यानिमित्त त्यांचा सत्कार मंदिर समितीकडून अशोक गाटे व्यवस्थापक, प्रशांत गाटे, रघु खटके, लक्ष्मण हवालदार, यांनी केला आहे. श्री कमलाई देवी मंदिर जतन संवर्धन काम प्रगतीपथावर असल्याकारणाने भाविकांनी सगळं हाताने देणगी देऊन या कामात सहकार्य करण्याचे आव्हान देखील श्री जगदंबा कमलादेवी देवस्थान ट्रस्ट कडून करण्यात आले आहे. तसेच ऑनलाईन देणगीची सुविधा उपलब्ध आहे संपर्क अशोक घाटे व्यवस्थापक मोबाईल नंबर ९४०४७०८९२४,

# कर्मयोगी समाजसेवी संस्थेकडून अकिवाट भूषण पुरस्कार प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी :

अकिवाट तालुका शिरोळ येथील कर्मयोगी समाजसेवी संस्था ही 'नावासाठी नाही तर गावासाठी' हा उपक्रम चार वर्षांपासून ग्रामस्वच्छता अभियानाच्या माध्यमातून गावातील गटारी पासून ते स्मशानभूमीची साफ सफाई तसेच शालेय परिसर,मंदिर परिसरात स्वच्छता करून गावाला स्वच्छ व सुंदर ठेवण्याचे कार्य नेहमी करत असतात. गावामधील अनेक व्यक्ति विविध क्षेत्रात काम करुन गावचे नावलौकिक करत आहेत.अशा व्यक्तीचा सन्मान करणे हे आपले कार्य आहे. हा उद्देश ठेवून चालू साला पासून पुरस्कार व गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुकाचा सोहळा साजरा करत असल्याचे संयोजक बाबासाहेब उर्फ बंटी रायनाडे यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

यावेळी गावचे सुपुत्र अरुण फरांडे(एम.डी.शिरगुप्पी शुगर्स )यांना



छत्रपती शिवाजी महाराज आदर्श कुशल संघटक पुरस्कार, संतोष माने सर(बी.डी.ओ) यांना कर्मवीर भाऊराव पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार, शहाजहान तहसीलदार (इंजिनीअर) यांना सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या आदर्श अभियंता पुरस्कार,राधीका पाटील (तलवार बाजी) यांना मेजर ध्यानचंद आदर्श खेळाडू पुरस्कार, सुरेश छत्रे(रांगोळीकार,वर्ल्ड रेकॉर्ड) यांना कलामहर्षी बाबूराव पेंटर आदर्श कला पुरस्कार, सुशिला कोळी (आरोग्य सेविका) यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श सेविका पुरस्कार, विद्यासागर हेरलगे (हॉटेल अनिल गावरान) यांना यशस्वी युवा उद्योजक पुरस्कार तर स्वर्गीय प्रकाश बिरनाळे(इंजिनीअर) मरणोत्तर राजर्षी शाहू स्मृती पुरस्कार यांचे चिरंजीव आकाश यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आला.

त्याच बरोबर समाजातील आजारी व गरजू नागरिकांसाठी उपयुक्त बेड,व्हिल चेअर,वॉकर साहीत्याचा लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

याशिवाय विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अक्षय अजितकुमार चौगुले, संग्राम महेश बावडेकर, रोहन सुरेश चव्हाण, महिपसिंग मानसिंग रजपुत, निलेश नंदकुमार कांबळे, सुप्रिया प्रमोद कुराडे, अभिषेक विद्यासागर उळागड्डे, अभय बाबूराव ऐनापुरे, मोतीलाल महावीर पट्टणकुडे, सुरज कुमार रायनाडे, प्रविण तानाजी गायकवाड, स्नेहा दत्तात्रय पाटील,दिव्या दिलीप गायकवाड,योगेश धनपाल कांबळे यांचाही मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

नियती आपल्याला संधी देते त्या संधीचे आपण सोने केले पाहिजे तसेच कोणतीही व्यक्ती अडचणीत असताना त्याच्याकडे पाठ फिरवण्या ऐवजी त्याच्या पाठी खंबीर उभे राहून त्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. अशी भावना दक्षिण भारत जैन सभा पदवीधर संघटनेचे नुतन अध्यक्ष तथा प्रसिद्ध चार्टर्ड अकोंन्टट भाऊसो नाईक यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विद्यासागर हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक पी.ए.मगदूम, सहाय्यक कृषी अधिकारी अर्जून राठोड, लोकनियुक्त सरपंच श्रीमती वंदना पाटील यांनीही आपल्या मनोगतातून संस्थेच्या गेल्या चार वर्षांपासून करत असलेल्या कार्याचे कौतुक करुन पुरस्कार प्राप्त व्यक्तिना शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन महावीर शिरगांवे, विद्यासागर उळागड्डे यांनी केले. या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या उपक्रमाबद्दल कर्मयोगी समाजसेवी संस्थेचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# डॉ. दगडू माने यांचा गुरुदत्त शुगर्स कारखान्यातर्फे सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : शिरोळ तालुका शिरोळ येथील ज्येष्ठ पत्रकार डॉ. दगडू माने यांना महाराष्ट्र शासनाकडून डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार मिळालेबद्दल टाकळीवाडी येथील गुरुदत्त शुगर्स कारखान्याचे चेअरमन माधवराव घाटगे (दादा) यांच्या हस्ते समाजभूषण डॉ दगडू माने (शिरोळ) यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर राहुल घाटगे साहेब, धीरज घाटगेसाहेब, राजवर्धन नाईक -निंबाळकर - सरकार, शिवाजीराव माने - देशमुख, विजयराव भोजे, दिलीपराव माने, शिवाजीराव सांगले, अमोल माने, रावसाहेब भोसले, गजानन कदम सर, श्रेयस माने, वैभव माने आदि उपस्थित होते.

# एमआयटी विश्वशांती गुरुकुलचे तालुकास्तरीय योगासन स्पर्धेत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाखरी/पंढरपूर : एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल वाखरी, पंढरपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय योगासन स्पर्धेत विश्वशांती गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी विविध योगासन प्रकारामध्ये दैदीप्यमान यश संपादन केले आहे. यामध्ये तालुकास्तरीय वैयक्तिक योगासन स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात शंभूराजे गवळी याने मुलांमध्ये प्रथम तर काव्यांजली इंगवले हिने मुलींमध्ये द्वितीय स्थान पटकावले. १७ वर्षाखालील गटात मुलांमध्ये शौर्य चौगुले आणि मुलींमध्ये वाणीश्री घाडगे यांनी तृतीय स्थान तसेच १९ वर्षाखालील गटात मुलांमध्ये मुस्तफा जमादार आणि मुलींमध्ये सिद्धी सावंत यांनी द्वितीय स्थान प्राप्त केले.

यानंतर झालेल्या लयबद्ध योगासन स्पर्धेत मुलांच्या वैयक्तिक १७ वर्षाखालील गटात शौर्य चौगुले व १९ वर्षाखालील गटात मुस्तफा जमादार यांनी प्रथम क्रमांकाने यश संपादन केले.



त्याचबरोबर येथे झालेल्या कलात्मक योगासन जोडी स्पर्धेत मुलांच्या १४ वर्षांखालील गटात शंभूराजे गवळी व स्वराज देशमुख, १७ वर्षांखालील गटात शौर्य चौगुले व मयुरेश पवार आणि १९ वर्षांखालील गटात कृष्णा गाढवे व मुस्तफा जमादार यांनी प्रथम क्रमांक मिळवला. याव्यतिरिक्त मुलींच्या कलात्मक योगासन जोडी स्पर्धेत १४ वर्षांखालील गटात ज्ञानेश्वरी वानवे व स्वाती माळवाडकर, १७ वर्षांखालील गटात वाणीश्री घाडगे व ईश्वरी गाढवे आणि १९ वर्षाखालील गटात दीक्षा जाधव व सिद्धी सावंत यांनी प्रथम क्रमांकाने यश संपादन केले.

तसेच यावेळी झालेल्या लयबद्ध योगासन जोडी स्पर्धेत मुलींमध्ये १७ वर्षांखालील गटात वाणीश्री घाडगे व ईश्वरी गाढवे आणि १९ वर्षांखालील गटात दीक्षा जाधव व सिद्धी सावंत यांनी प्रथम क्रमांक मिळवला. याबरोबरच यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी सोलापूर येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. जीवनामध्ये योगाचे महत्व तसेच योगासनामुळे प्राप्त होणारी शारीरिक सुदृढता, मानसिक आरोग्य याविषयी प्राचार्य शिवाजी गवळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी क्रीडा शिक्षिका पल्लवी पाटील व कविता कटारिया तसेच साहिल राणा यांनी परिश्रम घेतले. एम आयटी संस्थेच्या वतीने सर्व पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले आणि आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# सोलापूर जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिनकर भारती यांचा गुणवंत शिक्षक म्हणून सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : ओपन लिंक फाउंडेशन आणि जिल्हा परिषद सोलापूर यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या आचार्य विनोबा भावे या शैक्षणिक ॲपमध्ये जानेवारी २०२५ चा जिल्हा स्तरावरील 'स्टार टीचर' अवॉर्ड आणि जानेवारी २०२५ ते जुलै २०२५ या कालावधीतील जिल्हास्तरीय पहिल्या क्रमांकाचा 'पोस्ट ऑफ मंथ'चा अवॉर्ड अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा सलगर येथील कार्यरत पदवीधर शिक्षक श्री. दिनकर नंदिनी तुकाराम भारती यांना सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुलदीप जंगम साहेब आणि शिक्षणाधिकारी श्री. कादर शेख साहेब यांच्या हस्ते देत सन्मानित केले.

श्री.दिनकर भारती यांनी राबविलेल्या उपक्रमांचे सादरीकरण विविध व्हिडिओ आणि फोटोच्या मदतीने विनोबा अँपमध्ये अपलोड केले.त्याचे जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय मुल्यांकन केल्यानंतर त्यांची निवड जानेवारी २०२५ मधील स्टार टीचर अवॉर्ड आणि जानेवारी २०२५ ते जुलै २०२५ या कालावधीतील 'पोस्ट ऑफ मंथ' या पुरस्कारासाठी झाली. सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुलदीप जंगम साहेब , शिक्षणाधिकारी श्री. कादर शेख साहेब तसेच इतर मान्यवरांच्या उपस्थितीत श्री. दिनकर भारती यांना सन्मानित करण्यात आले.

श्री. दिनकर भारती यांच्या या कामगिरीबद्दल जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा सलगरचे मुख्याध्यापक आणि इतर शिक्षकवृंद यांनी कौतुकाची थाप देत पुढील कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्यात.

**वर्षावास निमित्ताने बौध्द धम्म प्रसार व प्रचार अभियान नळदुर्ग सर्कल - २०२५ अंतर्गत बुद्ध वंदना व धम्मदेशना प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन**

# तथागत भगवान गौतम बुद्ध यांचा 'बौद्ध धम्म' मानवाला आनंदायी जीवन जगण्याची शिकवण देतो : भंते शासन मेता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड :

सबंध मानव जातीला कर्मकांड व अंधश्रद्धा मुक्त निरोगी आणि आनंददायी जिवन जगण्याची शिकवण तथागत भगवान गौतम बुद्ध यांचा बौद्ध धम्म देतो म्हणूनच महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी नागपूर येथिल दिक्षा भुमीवर बौद्ध धम्माची दिक्षा घेऊन सुखी समाधानाने आनंदी जिवान जगण्यासाठी व आपल्या सर्वांगीण विकासाकरिता बौद्ध धम्माचा आणि शिक्षणाचा मार्ग दाखविला आहे. तेंव्हा महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून सर्व बहुजनानी पंचशीलाचे काटेकोर पणे पालन करून बौद्ध धम्माच्या मार्गाने जिवन व्यथित करावे असे अवाहान बुद्धीस्ट इंटरनॅशनल नेटवर्क भिक्खू संघ नवी दिल्लीचे महाराष्ट्र प्रभारी भंते शासन मेता (भिक्कूनी) यानी वागदरी ता.तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.

वर्षावास निमित्ताने बौध्द धम्म प्रसार व प्रचार अभियान नळदुर्ग सर्कल - २०२५ अंतर्गत वागदरी ता. तुळजापूर येथे बुद्ध वंदना व धम्मदेशना (प्रवचण) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भंते शासन मेता बोलत होत्या या प्रसंगी भंते विश्वमित्रा (भिक्कूनी) यांची धम्म देशना झाली.

प्रारंभी भंते शासन मेता,भंते विश्वमित्रा व उपासिका स्वाती संतराम गायकवाड यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून बुद्ध वंदना घेण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव तथा पत्रकार एस.के.गायकवाड यानी केले.

या प्रसंगी जेष्ठ कार्यकर्ते दत्तू वाघमरे संदीपान वाघमारे,अनिल वाघमारे, शिवाजी वाघमारे,महादेव वाघमारे, सुर्यकांत वाघमारे,दिपक वाघमारे,लक्ष्मण झेंडारे, माजी उपसरपंच मुक्ताबाई वाघमारे, कविता गायकवाड, उज्वला वाघमारे, श्रीदेवी वाघमारे,रेखाबाई झेंडारे, गीताबाई झेंडारे, कमलबाई धाडवे, शकुंतलाबाई वाघमारे, वंदना वाघमारे, सुगंधा वाघमारे, सह महिला,यूवा कार्यकर्ते उपस्थित होते.

# विक्रोळी पार्कसाईट मध्ये घडलेल्या दुर्दैवी दरड दुर्घनेनंतर मनपा एन विभागाकडून विशेष खबरदारी व उपाययोजनेला सुरुवात

## गेल्या तीन चार दिवसांपासून सातत्याने जोरदार मुसळधार पाऊस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : मुंबई शहरासह उपनगरात गेल्या तीन चार दिवसांपासून सातत्याने जोरदार मुसळधार पाऊस बरसत आहे.या पावसामुळे विक्रोळी पार्कसाईट वर्षा नगर येथील जनकल्याण सोसायटीत राहणाऱ्या मिश्रा कुटुंबाच्या घरावर शुक्रवारी(ता.१५)मध्यरात्री दरड कोसळली. या दुर्दैवी घटनेत साखरझोपेत असलेल्या मिश्रा कुटुंबातील शालू मिश्रा(१९)आणि सुरेश मिश्रा(५०)यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.तर आरती मिश्रा(४५) आणि ऋतुराज मिश्रा(२०) हे जखमी झाले होते.या दुर्दैवी घटनेनंतर मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे यांच्यासह संबंधित सर्व अधिकारी आणि स्थानिक प्रशासन यांनी येथील घोकादायक जागेची तत्काळ पाहाणी केली होती.तसेच मनपा एन विभागातर्फे येथील सर्वच डोंगराळ भागातील धोकादायक स्थितीत राहणाऱ्या स्थानिक रहिवाशांना पावसाळ्यात खबरदारी म्हणून सावधान नोटीस देऊन पूर्व सूचना दिली गेली आहे. तसेच विक्रोळी पार्कसाईट वर्षा नगर येथे दरड कोसळून घडलेल्या दुर्दैवी घटनेनंतर उपायुक्त संजय कुमार धोंडे,एन वॉर्डचे सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली इमारत व कारखाने विभागाचे सहाय्यक अभियंता विजयकुमार वाघ आणि कनिष्ठ अभियंता विलास जाधव यांनी तत्काळ या घटनास्थळी जाऊन अजून पुढे याठिकाणी कोणत्याही प्रकारची अशी दुर्दैवी घटना घडू नये तसेच पुन्हा दरड कोसळू नये म्हणून विशेष खबरदारी घेऊन त्याठिकाणी उपाययोजना करायला सुरुवात केली आहे.त्यामुळे कनिष्ठ अभियंता विलास जाधव यांच्याकडून दरडग्रस्त भागांमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना करत आहेत.यामध्ये धोकादायक भागांचे सर्वेक्षण केले जात असून त्याठिकाणी योग्यती कार्यवाही केली जात आहे.तसेच कनिष्ठ अभियंता विलास जाधव हे दरड कोसळून दुर्दैवी घडलेल्या मध्यरात्री ही स्वतः त्याठिकाणी सर्व प्रथम घटना स्थळी उपस्थित राहून मदत कार्य करत होते. तसेच स्थानिक सामाजिक कार्यकर्ते मंगेश धावडे हे देखील वारंवार सर्व मनपा प्रशासनाला सहकार्य करत आहेत.

मनपा एन विभागातील प्रभाग क्रमांक १२३ मधील डोंगराळ भागातील धोकादायक दरड कोसळण्याची शक्यता असलेल्या ठिकाणी विशेष खबरदारी मनपा एन विभाग घेत आहे.नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे,असे आवाहन मनपा एन विभाग पालिका प्रशासनाच्या वतीने स्थानिक नागरिकांना केले जात आहे.





# श्री सत्यसाई सेवा संघटनेकडून गोरगरीब विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप




पंढरपूर/प्रतिनिधी : श्री सत्यसाई सेवा संघटना, महाराष्ट्र राज्य मुंबई , यांच्यावतीने श्री रुक्मिणी विद्यापीठ संचालित मातोश्री ईश्वर आम्हा विद्यालय व जुनिअर कॉलेज पंढरपूर मधील गोरगरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचेवाटप व सत्यसाई भक्त चंद्रशेखर सर, संपत वाघाटे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना संपत जी आवाटी म्हणाली की विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून विद्यार्थी घडला तर देश घडेल या उद्देशाने श्री सत्यसाई संघटनेच्या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढत असलेला प्रसार आणि वापर याबद्दल माहिती देऊन एआय शिक्षण प्रणाली या प्रसारित सुरू करण्यात असल्याचे सांगून याचा वापर सर्वांनी करून घ्यावा असे सांगितले यावेळी विद्यार्थ्यांना ज्ञानाचा खजिना मिळणार असून यातून या जगात विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाची पाऊल टाकण्याची संधी मिळेल असेही सांगितले.

पुढे संस्था प्रमुख सल्लागार श्री विजयसिंह जी पवार म्हणाले की मानव सेवा हीच मानव सेवा या विचाराने ही संघटना सामाजिक क्षेत्रात कार्य करीत असून सत्य साईबाबांनी नेहमी सर्वांवर प्रेम करा व सर्वांची सेवा करा अशा संदेश दिला असून मुलांनी ए आय शिक्षणाचा वापर करून घेण्याचे आवाहन केले.

**मातोश्री ईश्वरंमा विद्यालयात सुरु होणार ए.आय. शिक्षण प्रणाली**

या कार्यक्रमासाठी दत्ता कोकरे, एनसीबी अध्यक्ष विराज पाटील, प्राचार्य नंदिनी गायकवाड, यांच्यासह पालक वर्ग व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभावरी डुबल यांनी मांडली तर आभार गणेश डोबल यांनी मांडले कार्यक्रम यशस्वी तेसाठी इरफान शेख, अभिजीत कोष्टी, पुजारी ढोले विजय भंडारे, माधुरी बोडके कुमोदनी सरदार, कल्याणी कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सलग तिसऱ्यांदा दरेगाव तंटामुक्त समिती अध्यक्षपदी बबनराव जायभाये

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : दरेगाव ग्रामपंचायतच्या महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदासाठी मतदान घेऊन भरघोस मतांनी बबनराव जायभाये यांची निवड झाली आहे. नुकतीच ग्रामपंचायतची ग्राम सभा संपन्न झाली. यावेळी ही निवड करण्यात आली. यावेळी तंटामुक्त गाव समितीची पूर्ण रचना करण्यात आली. या सभेस सरपंच पती,रवि मांन्टे उपसरपंच प्रकाश काळे माजी सरपंच तथा सदस्य अविदास बंगाळे. सुनील काळुसे. सुनील काळे. सुभाष जाधव. प्रकाश काळुसे. विठोबा मांटे .यासह सेवानिवृत्त पोलिस पाटिल , लक्ष्मण जायभाये , ग्रामसेवक एन बी इंगळे यासह ग्रामस्थ उपस्थित होते. होते. यावेळी ग्रामसभेत विचारविनिमय करण्यात आला. तसेच दरेगाव तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सलग तिसऱ्यांदा बबनराव जायभाये यांची मतदानाच्या माध्यमातून एक से साठ. मतांनी निवडून आले आहेत अध्यक्ष बबनराव जायभाये यांना गावकऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.

# घाटकोपर शिवसेना उपविभाग प्रमुख हरेश (अण्णा) धांद्रूत आयोजित दहीहंडी महोत्सव उत्साहात





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच आमदार व घाटकोपर विभाग प्रमुख दिलीप मामा लांडे,महाड-पोलादपूर तालुक्याचे लोकप्रिय कार्यसम्राट आमदार व मंत्री भरतशेठ गोगावले आणि आमदार तुकाराम काते यांच्या मार्गदर्शनाखाली घाटकोपर वासियांसाठी भव्य दिव्य दहीहंडी उत्साहाचे आयोजन घाटकोपर शिवसेना उपविभाग प्रमुख हरेश (अण्णा) धांद्रूत यांच्या वतीने प्रभाग क्रमांक १२७ अमृत नगर ट्रान्झिट कॅम्प याठिकाणी करण्यात आले होते. या दहीहंडी स्पर्धेत घाटकोपर मधील गोविंदा पथकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. तसेच यावेळी ५/६/७ थरांची यशस्वी सलामी देऊन गोविंदाचा जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी प्रत्येक सहभागी गोविंदा पथकाला रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.हा दहीहंडी उत्सव फक्त घाटकोपरमधील गोविंदा पथकांसाठी खास आयोजित करण्यात आला होता.आपल्या मराठी माणसाने आपले सण व परंपरा जपली पाहिजे हाच या आयोजना मागचा एकमेव उद्देश होता. या उत्सवाचे यशस्वी आयोजन घाटकोपर शिवसेना उपविभाग प्रमुख हरेश (अण्णा) धांद्रूत यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी महिला गोविंदा पथकांनी या दहीहंडी उत्सवात मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला होता.

# विद्यार्थी भित्तिपत्रकातून बौद्धिक संकल्पना साकारतो : मल्लिनाथ कल्याणशेट्टी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : वाचन, चिंतन, मनन करून विद्यार्थी भित्तिपत्रकाच्या माध्यमातून बौद्धिक संकल्पना आपल्या लेखन शैलीतून व्यक्त करू शकतो. म्हणून भित्तिपत्रके विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी उपयुक्त आहेत त्यासाठी शिक्षकांनी शाळा महाविद्यालयातून भित्तिपत्रके प्रकाशित करून विद्यार्थ्यांना लेखन करण्याची संधी द्यावी असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त भित्तिपत्रकांचे प्रकाशन**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान विद्या शाखेच्या वतीने स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने भित्तिपत्रक काढण्यात आले, त्याचे प्रकाशन करताना ते बोलत होते. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मुकुंद पत्की, महावीर शहा, संचालिका सौ शांभवीताई कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती,संचालक अशोक येणगुरे, महेश कापसे, जुनिअर विभाग प्रमुख सौ पुनम कोकळगी,प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, बापूजी निंबाळकर,खंडेराव घाटगे,शिवानंद पुजारी उपस्थित होते.

महाविद्यालयातील मराठी विभागाच्या विवेक भित्तिपत्रकामध्ये शेतकरी शेतमजुरांच्या व्यथा, पाऊस, श्रावणसरी लेख, कथा तर वाणिज्य संशोधन मंडळाच्या भित्तिपत्रकात अर्थसंकल्प, जीएसटी, कर प्रणाली, भारतावरील अमेरिकाचे टेरीफ म्हणजे आयात निर्यात कर तसेच विज्ञान विद्याशाखेच्या अग्निपंख भितीपत्रकात विज्ञानाने केलेली प्रगती, भारत पाक युद्धात वापरलेले ब्रह्मोस अस्त्र आदीची माहिती विद्यार्थ्यांनी लिहिली

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विवेक भित्तिपत्रकाचे संपादक प्रा भीम सोनकांबळे यांनी केले सूत्रसंचलन वाणिज्य भित्तिपत्रकाचे संपादक प्रा शितल फुटाणे यांनी केले तर आभार अग्निपंख भित्तिपत्रकाचे संपादक प्रा मनीषा शिंदे यांनी मानले.

**भित्तिपत्रक काचफलकाची आकर्षक सजावट**

**भारताच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाकडून काढण्यात आलेल्या भित्तिपत्रक काचफलकात रेखाचित्रे, तिरंगा झेंडा विषयास अनुसरून रंगीबेरंगी चित्रे लावण्यात आली होती. या आकर्षक सजावटीचे ज्येष्ठ संचालक मुकुंद पत्की यांनी कौतुक केले.**

भित्तिपत्रक उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष विद्यमान आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी कौतुक केले.

**बिक्कड सर मित्र परिवार चा प्रेरणादायी उपक्रम**

# कळंबमध्ये एमबीबीएस पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : कळंब शहरातील श्री. राजेंद्र बिक्कड सर व मित्र परिवाराच्यावतीने कळंब शहर व परिसरातील वैद्यकीय क्षेत्रातील (छएएढ) नीट २०२५ मधून एम बी बी एस प्रवेशास पात्र झालेल्या व एम.डी.स. व आयुर्वेदीक एम.एस साठी पात्र झालेल्या यशवंत भावी डॉक्टरांचा व क्रीडा क्षेत्रातील चमकत्या ताऱ्यांचा प्रातिनिधिक स्वरुपात कळंब शहरातील उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते शाल, बुके, पुष्पहार व टेथेस्कोप देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती.

यावेळी एम.बी.बी.एस. ला प्रवेश झालेल्या श्रावणी श्रीधर रितापुरे, ओंकार प्रशांत काळे, समर्थ संजय भांगे, आदर्श औदुंबर रितापुरे, अजिंक्य अखिल कुलकर्णी, श्रावणी पांडुरंग टेळे.,सांचीप्रिया सुधीर वाघमारे, एम.एस आयुर्वेदीक प्रवेशित विद्यार्थी शिवानी संतोष भांडे, एम.डी.एस प्रवेशित विद्यार्थी स्वप्निल रामहरी मुंडे, विशेष गौरव सत्यजित चेतन कात्रे - (स्क्वॅश स्पर्धेत महाराष्ट्रात चौथा क्रमांक मिळवल्याबद्दल) सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कळंब व परिसरातील प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉक्टर रमेश जाधवर, प्रमुख अतिथी म्हणून ह. भ. प. महादेव महाराज आडसूळ, कळंब पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पंढरीनाथ मगर,ड.तानाजी चौधरी, स्वप्नपूर्ती नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष विठ्ठल माने, दैनिक लोकमतचे पत्रकार बालाजी बप्पा आडसूळ, राष्ट्रपती पारितोषिक विजेते सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी अरविंदजी फुलारी, प्राचार्य व राजकीय कट्टा चे संपादक सतीश मातणे, युवा सेनेचे प्रमुख सागर बाराते, शिक्षण विस्तार अधिकारी सुशील फुलारी, व्हाईस ऑफ मीडियाचे अध्यक्ष चेतन कात्रे,आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमा प्रसंगी बालरोग तज्ञ डॉक्टर रमेश जाधवर यांनी वैद्यकीय पेशा हा सामाजिक भान राखून करावा. समाजसेवा हीच ईश्वर सेवा आहे हे ब्रीद अंगी करावे असे आवाहन केले. प्रमुखातिथी ह भ प महादेव महाराज अडसूळ यांनी डॉक्टर हे देव आहेत, त्यांनी सामाजिक बांधिलकी जपावी असा शुभ संदेश दिला. कळंब पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पंढरीनाथ मगर यांनी नीट परीक्षेतून मिळवलेल्या यशाचे कौतुक केलं. संभाजी ब्रिगेडचे माजी जिल्हाध्यक्ष ॲड. तानाजी चौधरी यांनी विद्यार्थी व आई वडील यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. राष्ट्रपती पदक विजेते कवी लेखक श्री अरविंद फुलारी यांनी स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाचं कौतुक केलं. या कार्यक्रमासाठी कळंब शहर व परिसरातील शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील बहुसंख्येने मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे आयोजक मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांनी केले तर सूत्रसंचालन उपक्रमशील शिक्षक, शिवव्याख्याते महादेव खराटे व आभार पत्रकार प्रदीप यादव यांनी मानले, कळंब शहर व परिसरातील गुणवंतांच्या या सोहळ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# भदंत सोमानंद यांची बोरगाव (तु.) येथे धम्मदेशना संपन्न



वागदरी/एस.के. गायकवाड : वर्षावास निमित्ताने तुळजापूर तालूक्यातील मौजे बोरगाव (तुपाचे) येथे बुध्दिष्ठ इंटरनॅशनल नेटवर्क भिक्कू संघ नवी दिल्ली चे राष्ट्रीय प्रभारी भदंत सोमानंद यांच्या धम्मदेशनेचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यांच्या समवेत भिक्कू संघाच्या महाराष्ट्राच्या प्रभारी भंते शासन मेता (भिकूनी), भंते विश्वमित्रा ( भिकूनी) उपस्थित होते.

मौजे बोरगाव (तुपचे ) चे येथे बौद्ध धम्म प्रचार व प्रसार आभियान नळदुर्ग सर्कल -२०२५ ता. तुळजापूर अंतर्गत वर्षावास निमित्ताने बुध्दिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क भिकू संघ नवी दिल्ली चे राष्ट्रीय प्रभारी सोमानंद यांच्या धम्मदेशनेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने भिकू संघाचे गावात आगमन होताच फटाक्याची अतिषबाजी करत पुष्पांची बरसात करुन स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना भदंत सोपानंद म्हणाले की भविष्यातील धोके टाळण्यासाठी तथागत भगवान बुध्दांचा स्वयंम प्रकाशित व्हा हा संदेश आत्मसात करून बौध्दानी शिक्षणाकडे लक्ष देवून देव धर्म कर्मकांडासह विविध कार्यक्रमवर अनावश्यक खर्च करण्यापेक्षा मुलांच्या शिक्षणावर खर्च करून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित शिक्षित सुसंस्कारक्षम पिढी घडवण्याचा प्रयत्न करा.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नुतन सरपंच कविता गौतम कांबळे ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून रिपाइं (आठवले)चे जिल्हा सचिव तथा पत्रकार एस.के गायकवाड हे होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन लक्ष्मण कांबळे यानी केले. या वेळी उपसरपंच लक्ष्मण पाटील, सहशिक्षक मोहन माने, पोलीस पाटील नागेश कलशेट्टी, सोसायटी चेअरमन बसवंतराव मुळे, जेष्ठ कार्यकर्ते दत्तात्रय साळूंके, माजी सरपंच शेखर कलशेट्टी, मधुकर सुतार, अण्णाराव फुलारी, मुख्याध्यापक राम बनसोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राहुल जाधव, अशोक कांबळे, शैलेंद्र सोनकांबळे, गौतम कांबळे, अनिल बनसोडे, अप्पाराव सोनकांबळे,सुधिर गायकवाड, अशिष जाधव, सह कर्मकर्त्यानी परिश्रम घेतले. यावेळी महिला, ग्रामस्थ, युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.